NOTICE is hereby given that the certificate(s) for the undermentioned securities of the Company has / have been lost / misplaced and the holder(s) of the said securities/applicant(s) has / have applied to the Company to issue duplicate certificate(s).
Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the Company at its Registered Office within 15 days from this date, else the Company will proceed to issue duplicate certificate(s) without further intimation.

Sr. no.	Folio No.	Name of Shareholder(s)	Kind of securities and face value	No. of securities	Distinctive Number(s)
1.	HSU0105018	Urvi Sunilbhai Trivedi	Equity Shares of ₹1/- each	2,500	21644751 to 21647250

For The Tata Power Company Limited
Sd/-
Vispi S. Patel
Company Secretary
FCS 7021
Place: Mumbai
Dated: November 16, 2026

MUTHOOT FINCORP LTD. | GOLD AUCTION NOTICE



'इंडिया' आघाडीची प्रश्नावली

थेट निवडणूक आयोगाकडून स्पष्टीकरणाची मागणी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेवरून केंद्रीय निवडणूक आयोगाला धारेवर धरणाऱ्या 'इंडिया' आघाडीने थेट मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याकडून स्पष्टीकरण मागण्याची तयारी केली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातील मुद्द्यांची पडताळणी करण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्तांसह अन्य दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी, तसेच उपनिवडणूक आयुक्त यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना ४८ प्रश्न विचारण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी 'इंडिया' आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.

त्यासंदर्भात सोमवारी सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला. मुख्य याचिका लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी व 'इंडिया' आघाडीतील नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. त्यावर सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी, १७ नोव्हेंबरला सुनावणी होणार आहे.

कोणते प्रश्न विचारण्याची परवानगी हवी?

- देशभरात 'एसआयआर' राबवण्याचा निर्णय नेमका कधी आणि कोणत्या प्रक्रियेद्वारे घेण्यात आला? या निर्णयासंबंधी फाइल क्रमांक, मंजुरीची तारीख काय? आयोगाची बैठक झाली होती की, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मान्यता घेण्यात आली? तिन्ही निवडणूक आयुक्तांनी निर्णयाला कधी आणि कशा पद्धतीने संमती दिली?
- देशव्यापी 'एसआयआर'ची आवश्यकता असल्याचे आयोगाने २०२५च्या आदेशात नमूद केले होते. मात्र, माहिती अधिकारांतर्गत या निर्णयासंबंधी माहिती मागवली असता ती उपलब्ध नसल्याचे उत्तर देण्यात आले. आयोगाच्या आदेशातील भूमिका आणि माहिती अधिकारांतर्गत दिलेल्या उत्तरातील विसंगती स्पष्ट करण्याची मागणी
- १९ फेब्रुवारी २०२५ ते २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी 'एसआयआर', 'ईसीआयनेट', 'फॉर्म ६' किंवा मतदारयाद्यांशी संबंधित अपील प्रक्रियेबाबत किती वेळा लेखी आक्षेप किंवा असहमती नोंदवली? संबंधित फाइल क्रमांक, तारखा आणि निर्णयांचा तपशीलही दिला जावा.
- 'एसआयआर'संदर्भातील निर्णय बहुमताने घेतले असल्यास त्याला कोणाचा विरोध होता आणि कोणत्या प्रक्रियेद्वारे अंतिम निर्णय झाला?
- 'ईसीआयनेट' आणि 'ईआरओनेट' या डिजिटल यंत्रणाद्वारे मतदारयादीत नावे समाविष्ट करणे, वगळणे किंवा दुरुस्त करण्याचे अधिकार नेमके कोणाकडे आहेत?
- निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय मतदारांच्या नोंदींमध्ये बदल करण्यात आले आहेत का? खासगी कंपन्यांचे कर्मचारी किंवा कंत्राटदार यांना मतदारयादीतील माहिती बदलण्याचे अधिकार देण्यात आले होते का?
- मतदारयादीतील प्रत्येक बदलाची डिजिटल नोंद ठेवली जाते का? संबंधित बदल कोणी आणि कधी केला, त्याला अधिकृत आदेशाचा आधार होता का?
- २४ जून २०२५ पासून मतदारयादीतील बदलांच्या नोंदी आणि त्यांचे डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवण्यात आले आहेत का?
- नवीन मतदार नोंदणीसाठी वापरण्यात येणाऱ्या फॉर्म ६मध्ये अतिरिक्त घोषणापत्राचा समावेश करण्याचा निर्णय कोणी घेतला? त्याला कोणत्या स्तरावर मंजुरी देण्यात आली आणि सर्व निवडणूक आयुक्तांची संमती घेण्यात आली होती का?
- घोषणापत्र किंवा मतदार नोंदीच्या मॅपिंगसंदर्भातील माहिती सादर न केल्यामुळे किती अर्ज प्रलंबित ठेवण्यात आले किंवा नाकारण्यात आले?
- पश्चिम बंगालमध्ये न्यायिक अधिकाऱ्यांनी मतदारयादीत नावे समाविष्ट करण्याचे आदेश दिल्यानंतर निवडणूक आयोगाने किती प्रकरणांत अपील केले? अपील करण्याचा निर्णय कोणी घेतला आणि कोणत्या निकषांवर प्रकरणांची निवड झाली?
- गोव्यातील ९७ मतदारांच्या प्रकरणातील ८८ जणांनी फॉर्म सहाद्वारे अर्ज केल्यानंतर किती जणांची मूळ नोंद पुन्हा बहाल करण्यात आली?



'नीट'साठी बारावी बोर्डाच्या गुणांनाही महत्त्व द्यावे!

राज्यांचा निलेकणींच्या नेतृत्वाखालील कृती दलाकडे प्रस्ताव

एक्स्प्रेस वृत्त

नवी दिल्ली : वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेल्या 'नीट-यूजी' परीक्षेत बारावीच्या बोर्डाच्या गुणांनाही महत्त्व द्यावे, असा प्रस्ताव अनेक राज्यांनी मांडला आहे. नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखालील कृती दलाने परीक्षा सुधारणांच्या मुद्द्यांवर आतापर्यंत झालेल्या सल्लामसलत बैठकांमध्ये विविध पक्षांनी बारावीच्या गुणांनाही महत्त्व देण्याची भूमिका मांडली आहे, अशी माहिती 'द इंडियन एक्स्प्रेस'ला मिळाली आहे.



वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना वर्षभरात एकापेक्षा जास्त वेळा 'नीट-यूजी' परीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध असावा, तसेच संगणक आधारित परीक्षा (सीबीटी) प्रारूपाचा स्वीकार केला जावा, या प्रस्तावांवरही चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

'नीट' ही सामाईक परीक्षा असल्याने एकाच परीक्षेवर अवलंबून राहिल्यामुळे कोचिंग केंद्रांचे महत्त्व वाढते, त्यामुळे विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षांसाठी चांगल्या प्रकारे तयारी करता येत नाही, असा मुद्दा या बैठकांदरम्यान उपस्थित झाल्याचे सूत्रांनी सांगितले. तसेच यामुळे डमी शाळांची संख्या वाढल्याचेही काहींचे म्हणणे आहे.

सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, तमिळनाडूचा अपवाद वगळल्यास दक्षिणेकडील इतर सर्व राज्यांनी कागद आणि पेन चाचणी पद्धतीऐवजी 'सीबीटी' पद्धतीने 'नीट' परीक्षा घेण्यास पाठिंबा दर्शवला. सुरुवातीला दोन्ही पद्धतींचा वापर करण्याबद्दलही चर्चा करण्यात आली.

चकमकीत दहशतवादी ठार

श्रीनगर : जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत उमर दर हा दहशतवादी ठार झाला. तर लतीफ भट्ट याचा शोध सुरू आहे. हे दोघे सीआरपीएफच्या चौकीवर झालेल्या हल्ल्यात सामील होते.

बिल्किस बानोप्रकरणी दोघांना जामीन

नवी दिल्ली : गुजरातच्या २००२च्या दंगलींदरम्यान बिल्किस बानो सामूहिक बलात्कार आणि सामूहिक हत्याकांड प्रकरणातील दोन दोषींची शिक्षा सर्वोच्च न्यायालयाने स्थगित केली आणि त्यांना जामीन मंजूर केला. या हत्याकांडात बिल्किस बानोच्या कुटुंबातील सात जणांची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात दोषी ठरवण्यात आलेल्या बिपिन चंद्र जोशी आणि प्रदीप मोरधिया या दोघांनी १७ वर्षांपेक्षा जास्त काळ तुरुंगवास भोगला आहे, असे निरीक्षण नोंदवत न्या. एम. एम. सुंद्रेश आणि न्या. पी.बी. वराळे यांच्या खंडपीठाने त्यांना जामीन मंजूर केला.

सर्वोच्च न्यायालयाने २८ ऑक्टोबरला दिलेला हा निकाल सोमवारी न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला. जोशी आणि मोरधिया यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील सिद्धार्थ लुथ्रा यांनी निवेदन सादर केले की यापैकी एका दोषीचे नाव एफआयआरमध्ये नव्हते आणि दंगलींनंतर सुमारे तीन वर्षांनी त्याचे नाव खटल्यात गोवण्यात आले. तर, सरकारची बाजू मांडणारे अतिरिक्त महान्यायअभिकर्ता राजा ठाकरे यांनी जोशी व मोरधियाच्या जामीन याचिकेला विरोध केला. या प्रकरणी नोंदवल्यात आलेल्या संबंधित बाबी उच्च न्यायालय आणि कनिष्ठ न्यायालयाने विचारात घेतल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने नमूद केले की, "याचिकाकर्त्यांनी १७ वर्षांपेक्षा जास्त काळ तुरुंगवास भोगला आहे. तसेच एक याचिकाकर्ता अपंग आहे. अपिलामध्ये वास्तव आणि कायदा या दोन्हींच्या आधारे निर्णय घेणे आवश्यक आहे."



पंतप्रधान मोदींची मेजवानीला उपस्थिती

फिलिपिन्सचे अध्यक्ष फर्डिनांड आर मार्कोस ज्युनियर यांनी आसियान शिखर परिषदेसाठी हजर असलेल्या सर्व राष्ट्रप्रमुख आणि नेत्यांसाठी 'फिलिपिन इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर' येथे रात्रीची मेजवानी आयोजित केली. यावेळी मोदी यांनी फिलिपिनो पुरुषांचा औपचारिक राष्ट्रीय पोशाख असलेला बारोंग तागालोग परिधान केला होता.

'क्वाड' नेत्यांची आज बैठक

चीन-अमेरिका-रशिया त्रिपक्षीय भेटीपूर्वी होणाऱ्या चर्चेकडे लक्ष

वृत्तसंस्था, मनिला/ बीजिंग

फिलिपिन्समध्ये सुरू असलेल्या आसियान आणि पूर्व आशिया शिखर परिषदांच्या दरम्यान 'क्वाड' गटाच्या भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या चार सदस्य देशांच्या राष्ट्रप्रमुखांची मंगळवारी भेट होत आहे. गुरुवारी अमेरिका, रशिया आणि चीनच्या अध्यक्षांची प्रथमच त्रिपक्षीय बैठक होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, जपानच्या पंतप्रधान सनाए ताकायची आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांच्या चर्चेकडे सर्वांचे लक्ष असेल.

जानेवारी २०२५मध्ये ट्रम्प यांचा अध्यक्षपदाचा दुसरा कार्यकाळ सुरू झाल्यापासून ते पहिल्यांदाच क्वाडच्या बैठकीत सहभागी होणार आहेत. व्हाइट हाउसच्या सहाय्यक माध्यम सचिव ऑलिव्हिया वेल्स यांनी यासंबंधी माहिती दिली. त्या म्हणाल्या, "ट्रम्प यांच्या नेतृत्वात, क्वाडने दाखवून दिले आहे की ही कृतीशील भागीदारी आहे. ते मुक्त व खुल्या हिंद-प्रशांत महासागरी प्रदेशासाठी सर्वात कठीण प्रादेशिक आव्हानांचा सामना करतात आणि नव्या संधी निर्माण करतात."

हिंद-प्रशांत महासागरी प्रदेश, तसेच दक्षिण चिनी सागरी प्रदेशात चीनच्या आक्रमक भूमिकेकडे बारकाईने लक्ष देण्याची क्वाडची भूमिका आहे. मात्र, ट्रम्प प्रशासनाच्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणाअंतर्गत अमेरिकेने चीनप्रति आपले धोरण काहीसे मवाळ केल्याचे मानले जाते. मात्र, ट्रम्प प्रशासनाने यासंबंधीचे दावे फेटाळले आहेत.

प्रस्तावित चर्चेची चीनकडून प्रशंसा

बीजिंग : चीन, रशिया आणि अमेरिकेच्या अध्यक्षांची १९ नोव्हेंबर रोजी शेंझेन येथे होणारी पहिलीवहिली ऐतिहासिक बैठक ही अभूतपूर्व अशी असेल, असे चीनने म्हटले आहे. 'आशिया-पॅसिफिक आर्थिक सहकार्य' (अॅपेक) शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी शेन्झेन येथे बैठकीचे आयोजन केले आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे या बैठकीला उपस्थित राहतील, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. तिन्ही अध्यक्ष समोरासमोर असलेली ही इतिहासातील पहिलीवहिलीच बैठक ठरणार आहे. ही बैठक ऐतिहासिक आणि अतिमहत्त्वाची अशी असेल, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते माओ निंग यांनी म्हटले आहे.

अण्वस्त्र नि:शस्त्रीकरणाला 'यूएन'चा पाठिंबा

- 'अमेरिका, रशिया आणि चीनच्या अण्वस्त्र नि:शस्त्रीकरणाच्या कुठल्याही प्रयत्नांमध्ये संयुक्त राष्ट्रांची (यूएन) पूर्ण सहभागी होण्याची तयारी आहे,' असे प्रतिपादन 'यूएन'चे सरचिटणीस अँटोनिओ गुटेरस यांनी सोमवारी केले.
- आसिआनच्या सदस्य देशांनी सोमवारी ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया, संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनिओ गुटेरस यांच्याबरोबर चर्चा केली. त्या वेळी गुटेरस यांनी हे वक्तव्य केले. या वेळी युद्धग्रस्त असलेल्या युक्रेनमध्ये शस्त्रसंधी आणि म्यानमारमध्ये मोठ्या प्रमाणावर मदतीची अपेक्षा 'आसिआन'ने व्यक्त केली.

'पुस्तकांबद्दल थोडा आदर दाखवा!'

नवी दिल्ली : "पुस्तकांबद्दल थोडा आदर दाखवा," अशा शब्दांमध्ये सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पाअंतर्गत केंद्रीय सचिवालय ग्रंथालयाच्या प्रस्तावित स्थलांतरावरून सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकारला सुनावले. १३५ वर्षे जुन्या ग्रंथालयाचे स्थलांतर करताना त्यातील ८.५ लाख पुस्तकांच्या देखभालीसाठी पुरेशी व्यवस्था न केल्याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.

ग्रंथालयाचा वारसा जतन करताना अधिकारी तात्पुरता विचार करत असल्याची टिप्पणी न्या. संजय कुमार आणि न्या. संजीव सचदेव यांच्या खंडपीठाने केली. सोमवारी हे प्रकरण सुनावणीसाठी आले असता, अतिरिक्त महान्यायअभिकर्ता ऐश्वर्या भाटी यांनी हे प्रतिज्ञापत्र आजच दाखल केल्याचे न्यायालयाला सांगितले आणि सुनावणी मंगळवारी घेण्याची विनंती केली. नोव्हेंबरपर्यंत पुस्तके स्थानांतरित करण्यासाठी घाई केली जात आहे, अशी तक्रार याप्रकरणी न्यायमित्र म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ज्येष्ठ वकील हरिप्रिया पद्मनाभन यांनी केली. तसेच, हा प्रकार थांबवण्याची त्यांनी विनंती केली. याप्रकरणी पुढील सुनावणी शुक्रवारी होईल.

जेनसेन हुआंग यांना पुन्हा 'सीईओ' करण्याची मागणी

नवी दिल्ली : 'एनव्हिडिया'चे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) जेनसेन हुआंग यांना पुन्हा पदावर नियुक्त करावे, अशी मागणी करणाऱ्या खुल्या पत्रावर एक लाख ७५ हजारांहून अधिक जणांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. उद्योगपती इलॉन मस्क यांच्यासह जगभरातील तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गजांनी या मोहिमेला पाठिंबा दिला आहे. हुआंग यांच्या राजीनाम्यामागील कारणांची स्वतंत्र चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना पदावरून दूर ठेवू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

'स्टँड विथ जेनसन डॉट कॉम' या संकेतस्थळावर सुरू असलेल्या मोहिमेवर सोमवारपर्यंत 'एनव्हिडिया'चे सध्या कार्यरत असल्याचा दावा करणाऱ्या ८,७४५ कर्मचाऱ्यांसह माजी कर्मचाऱ्यांच्या १,५७६ स्वाक्षऱ्या आहेत. या माहितीची स्वतंत्र पडताळणी झालेली नसल्याचे संकेतस्थळाने स्पष्ट केले आहे. 'एनव्हिडिया'ने १२ नोव्हेंबरला हुआंग यांच्या तिन्ही पदांच्या राजीनाम्याची घोषणा केली होती.

मध्य रेल्वे
शुद्धिपत्र-२
निविदा क्र. : २७.२६.३२७६, विभाग/रेल्वे : प्रोक्योरमेंट/मध्य रेल्वे, बंद होण्याची तारीख : २३.११.२०२६, निविदेचे शीर्षक : गीएली ॲक्टिव्हिटी की स्विच, सुधारणा : १. एनआयटी हेडर : फील्डचे नाव : निविदा उघडण्याची तारीख /वेळ, विद्यमान तारीख : १३.११.२०२६ रोजी स. ११:०० वा. सुधारित तारीख : २३.११.२०२६ रोजी स.११:०० वा. तपशील www.ireps.gov.in या वेबसाइटवर पाहता येईल DB/706

NAGPUR AGRICULTURE PRODUCE MARKET COMMITTEE
(Market Of National Importance)
Pandit Jawaharlal Nehru Market Yard, Kalamana, Nagpur
Ph. 0712 - 2680280 / 2680877
Email : apmcnagpur@rediffmail.com I Website : www.apmcnagpur.in
TENDER NOTICE No. Const Dept 2026-27
ONLINE TENDER
Secretary A.P.M.C (M.N.I) Kalmna Nagpur invite Online percentage rate Tender in B-1 form for civil work from the qualified Contractor as per NIT. The Details of the work can this seen in the office of APMC Nagpur or Website: www.apmcnagpur.in OR mahatenders.gov.in
1) All Details of above tender can be seen on NOTICE BOARD of APMC Nagpur
2) All Rights it reseverd to reject any or all tenders without assigning any reason thereof
3) Tender Shedule as per NIT.
Secretary
A.P.M.C. Nagpur

VASANTDADA SUGAR INSTITUTE
Manjari Bk. Tal. Haveli, Dist. Pune 412307.
Ph.(Off):020-26902286/316 Website : www.vsisugar.com
e-TENDER NOTICE
e-Tender on percentage basis are invited from reputed / experienced contractors fulfilling given eligibility criteria for below.

Sr. No	Item/Description	Tender Form Fees (GST Extra)	EMD Amount
1	Providing and installation of Hangers, Stalls and other furniture on hire basis.	25,000/-	2,50,000/

For detailed, please visit MKCL Website: https://sugarmart.sets.co.in Last date for online submission is 01/12/2026. Institute reserves the right to accept or to reject any or all tenders without assigning any reason thereof.
Director General

बायर क्रॉपसायन्स लिमिटेड
सीआयएन : एल२४२१०एमएच१९५८पीएलसी०११८३
नोंदणीकृत कार्यालय : बायर हाऊस, सेंट्रल ॲव्हेन्यू, हिरानंदानी ईस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४०० ६०७.
टेलि क्र.: ०२२-२५३१ १२३४; फॅक्स: ०२२-२५४५ ५०६३
मोबाईल क्र.: +९१ ७७००९ १०४९९
वेबसाइट : www.bayer.in; ईमेल : ir_bcsl@bayer.com
भौतिक प्रतिभूतींचे हस्तांतरण व डिमटेरियलायझेशनकरिता ("डिमॅट") विशेष खिडकी संबंधित भागधारकांकरिता सूचना
भागधारकांना सूचना या विषयावरील आमच्या आधीच्या वृत्तपत्रातील जाहिरातीचा संदर्भ देऊन, कंपनीच्या भागधारकांना पुन्हा एकदा कळवण्यात येत आहे की, ०५ फेब्रुवारी २०२६ ते ०४ फेब्रुवारी २०२७ या एका वर्षाच्या कालावधीसाठी एक विशेष खिडकी खुली करण्यात आली आहे. ही खिडकी ०१ एप्रिल २०१९ पूर्वी खरेदी / विक्री केलेल्या भौतिक प्रतिभूतींचे हस्तांतरण आणि डिमटेरियलायझेशन प्रक्रिया सोयीस्कर बनवण्यासाठी, दिनांकित ३० जानेवारी २०२६ रोजीच्या सेबी परिपत्रक क्र. HO/38/13/11(2)2026-MIRSD-POD/1/3750/2026 च्या अनुसार सुरू करण्यात आली आहे. ही खिडकी सदर हस्तांतरण विनंत्याकरितासुद्धा उपलब्ध असणार आहे, ज्या कागदपत्रे / प्रक्रियेतील विसंगतीमुळे नामंजूर झाल्या होत्या / परत केल्या होत्या किंवा अन्य कारणास्तव दुर्लक्षित्या होत्या.
हस्तांतरित केलेल्या प्रतिभूती वैध कागदपत्रे सादर केल्यानंतर आणि "आरटीए" / कंपनीद्वारे त्यांची पडताळणी केल्यानंतरच हस्तांतरितीकरिता अनिवार्यपणे डिमॅट मोडमध्ये जमा केल्या जातील. या प्रतिभूती हस्तांतरण नोंदणीच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी लॉक-इन अंतर्गत राहतील आणि सदर लॉक-इन कालावधीत त्या हस्तांतरित / धारणाधिकार-चिन्हांकित / तारणगहाण ठेवता येणार नाहीत.
तथापि, हस्तांतरक व हस्तांतरिती यांच्या दरम्यान वाद अंतर्भूत प्रकरणांचा या विशेष खिडकीमध्ये विचार केला जाणार नाही आणि न्यायालय / "एनसीएलटी" प्रक्रियेद्वारा हस्तांतरक व हस्तांतरिती यांच्याद्वारे तडजोड करता येईल. याशिवाय, भाग ज्यांचे "इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड"मध्ये ("आयईपीएफ") हस्तांतरण झाले आहेत त्यांचा प्रक्रियेकरिता या खिडकीअंतर्गत विचार केला जाणार नाही.
भागधारक जे सुविधेचा लाभ घेऊ इच्छित आहेत, त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट ("आरटीए") म्हणजेच "एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड"कडे (पूर्वीची लिंक इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) पत्ता - सी-१०१, पहिला मजला, २४७ एम्बॅसी पार्क, एल.बी.एस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०० ०८३, टेलि नं. : +९१ ८१० ८११ ८४८४, फॅक्स नं. +९१ २२ ६६५६ ८४९४, वेबसाइट : https://in.mpms.mufg.com उक्त परिपत्रकामध्ये विनिर्दिष्ट केलेली आवश्यक कागदपत्रे, तसेच कंपनी कायदा २०१३, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ नुसार आवश्यक कागदपत्रे, आणि या संदर्भात वेळोवेळी जारी करण्यात आलेली व अन्य कोणत्याही संबंधित सेबी परिपत्रकानुसार आवश्यक असलेली कागदपत्रे सादर करणे / तरतूद करणे अनिवार्य आहे किंवा ir_bcsl@bayer.com यावरून कंपनीला ईमेल पाठवावा. जर कोणत्याही शंका असल्यास भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी https://web.in.mpms.mufg.com/helpdesk/Service_Request.html यावर सेवा विनंती पाठवावी.
बायर क्रॉपसायन्स लिमिटेडकरिता
स्वाक्षरी /-
भारती शेट्टी
कंपनी सेक्रेटरी व अनुपालन अधिकारी
(सभासद क्र. एसीएस २४९९९)
स्थळ : ठाणे
दिनांक : १७ नोव्हेंबर २०२६

भरतपुर विकास प्राधिकरण, भरतपुर
क्रमांक : लेखा/भा.वि.प्रा./2026 27/15783 96 दिनांक 05/11/2026
अल्पकालीन ऑनलाईन निविदा सूचना सं. 57/2026-27
राजस्थान के राज्यपाल महोदय की ओर से एजेंसियों / संवेदकों से निर्धारित प्रपत्र में ई-प्रोक्योरमेन्ट प्रक्रिया से कुल 01 कार्यों हेतु ऑनलाईन निविदाएं आमन्त्रित की जाती है।
उक्त कार्यों का विस्तृत विवरण, निविदा शर्तें, अनुमानित लागत राशि, निविदा बेचने, प्राप्त करने एवं खोलने की दिनांक आदि सम्पूर्ण विवरण वेबसाईट https://bhda.rajasthan.gov.in/home/dptHome http://eproc.rajasthan.gov.in एवं http://sppp.raj.nic.in portal पर देखा जा सकता है।
निविदा से संबंधित किसी भी प्रकार का संशोधन http://sppp.raj.nic.in portal http://eproc.rajasthan.gov.in का अवलोकन करें।
UBN No. : WAQ2627SLRC00138
सचिव
भरतपुर विकास प्राधिकरण, भरतपुर
राज.संवाद/सी/26/13272

IDEMI
Government of India
Ministry of Micro, Small and Medium Enterprises
Institute for Design of Electrical Measuring Instruments, Mumbai
Government Certificate Course on Artificial Intelligence for Finance, Trading and Stock Market
Sessions include hands on practice
Course Timing- 8.30 pm to 10 pm
Course Duration 5 Days
ऑनलाइन (ONLINE)
Course Date- 23 to 27 November 2026
Email id : training@idemi.org Web : www.idemi.org Ph : (022) 2405 0301/2/3/4
Introduction to AI and models, using AI for - company fundamental & technical analysis, stock valuation, quantitative and algorithmic trading, developing and integrating prediction strategies, risk and portfolio management, statistical modeling, economic interpretation, financial analysis and valuation, RBI, SEBI norms
Fees- 3500+18 % GST (fees are not refundable)
After successful completion, certificate will be issued
Contact- 9403566219, 8007765693, 8291413843

NAGPUR AGRICULTURE PRODUCE MARKET COMMITTEE
(Market Of National Importance)
Pandit Jawaharlal Nehru Market Yard, Kalamana, Nagpur
Ph. 0712 - 2680280 / 2680877
Email : apmcnagpur@rediffmail.com I Website : www.apmcnagpur.in
TENDER NOTICE No. Const Dept 2026-27
ONLINE TENDER
Secretary A.P.M.C (M.N.I) Kalmna Nagpur invite Online percentage rate Tender in B-1 form for civil work from the Contractor registered with PWD / ZP / NIT / NMC Departments In Maharashtra in appropriate class. The Details of the work can this seen in the office of APMC Nagpur or Website: www.apmcnagpur.in OR mahatenders.gov.in
1) All Details of above tender can be seen on NOTICE BOARD of APMC Nagpur
2) All Rights r reseverd to reject any or all tenders without assigning any reason thereof.
3) Tender Shedule as per NIT
Secretary
A.P.M.C. Nagpur

TATA
TATA POWER
दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड
CIN : L28920MH1919PLC000567
नोंदणीकृत कार्यालय : बॉम्बे हाउस, २४, होमी मोदी स्ट्रिट, मुंबई ४०० ००१.
टेलि : +९१ २२ ६६६५ ८२८२ ईमेल : tatapower@tatapower.com वेबसाइट : www.tatapower.com
भागधारकांकरिता सूचना
सूचना याद्वारा देण्यात येते की, कंपनीचे खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींकरिता प्रमाणपत्रे गहाळ झाली आहेत/हरवली आहेत आणि उक्त प्रतिभूतींचे धारक/अर्जदारांनी प्रतिलिपीत प्रमाणपत्राच्या निर्गमनकरिता कंपनीकडे अर्ज केला आहे/केले आहेत. कोणत्याही व्यक्तीचा उक्त प्रतिभूतींबाबत दावा असल्यास, तिने या तारखेपासून १५ दिवसांच्या आत कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सदर दावा दाखल करावा, अन्यथा कंपनी कोणतीही पुढील सूचना न देता प्रतिलिपीत प्रमाणपत्रांच्या निर्गमनाची प्रक्रिया सुरू करील.

अ. क्र	फोलिओ नं.	भागधारकाचे नाव	प्रतिभूतीचा प्रकार व दर्शित मूल्य	प्रतिभूतींची संख्या	विभिन्न क्र
१.	H5U0105018	उर्वी सुनिल्भाई त्रिवेदी	प्रत्येकी रु. १/- चे इक्विटी भाग	२,५००	२१६४४७५१ ते २१६४७२५०

दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
विस्पी एस. पटेल
कंपनी सचिव
एफसीएस ७०२१
स्थळ : मुंबई
दिनांकित : १६ नोव्हेंबर, २०२६

फॉर्म नं. सीएए २
[कंपन्या (तडजोड, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम, २०१६ च्या नियम ६ आणि ७ सामह वाचलेल्या कंपन्या कायदा, २०१३ च्या कलम २३०(३) च्या अनुसार]
मननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण खंडपीठ-III यांच्यासमोर
सीए(सीएए)/२०१(एमबी)२०२५
आणि
कंपन्या कायदा, २०१३ च्या कलम २३०च्या प्रकरणात
आणि
तडजोड योजनेच्या प्रकरणात
आणि
कंपन्या कायदा, २०१३ चे कलम २३०(१) अंतर्गत प्रथम प्रस्ताव आदेशाच्या (फर्स्ट मोशन ऑर्डर) प्रकरणात [माननीय एनसीएलटी मुंबई-III यांच्या समोर सी. पी. नं. १५७०/आयबी/२०१७ यांतील सुरू केलेल्या परिसमापनातील]
श्री संतोष गुलाबराव शिंदे ....प्रस्तावक
आणि
विभूती कॉर्न्स अँड फूड्स प्रा. लि. (परिसमापनातील) ....कॉर्पोरेट ऋणको
यांच्या प्रकरणात :
अनिल काशी द्रोलिया 'विभूती कॉर्न्स अँड फूड्स प्रा. लि.'चे परिसमापक ....परिसमापक 'विभूती कॉर्न्स अँड फूड्स प्रायव्हेट लिमिटेड'च्या "एससीसी" सदस्यांच्या सभेच्या सूचनेची माहिती व पुरवठा सूचना याद्वारे देण्यात येते की दिनांकित ०६.११.२०२६ आदेशान्वये, मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण मुंबई-III यांनी पूर्वोक्त कंपनीचे धनको आणि उक्त कंपनी दरम्यान श्री. संतोष गुलाबराव शिंदे यांच्याद्वारा सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावित तडजोड व व्यवस्था, फेरबदलासह किंवा त्याशिवाय, विचारात घेण्याच्या हेतूसाठी, जसे उचित वाटेल तसे, आयोजन करावयाच्या "मेसर्स विभूती कॉर्न्स अँड फूड्स प्रायव्हेट लिमिटेड"च्या "एससीसी" (भागधारकांची सल्लागार समिती) सदस्यांच्या (सर्व धनको) एका सभेचे आयोजन करण्याचे निदेश दिले आहेत.
सदर आदेशाच्या अनुषंगाने आणि दिलेल्या निर्देशानुसार याद्वारे पुढील सूचना देण्यात येते की, सदर कंपनीच्या "एससीसी" सदस्यांच्या (म्हणजे "सीओसी") सभेचे आयोजन गुरुवार, १७ डिसेंबर, २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता, बँक ऑफ महाराष्ट्र, ट्रेंड्स असेट्स मॅनेजमेंट ब्रँच, ४ था मजला, ४५/४७ जनमंगल बिल्डिंग, समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०००९१ येथे केले जाईल. सदर "एससीसी" सदस्यांना योजना विचारात घेण्यासाठी व खालील कामकाजावर विचारविनिमय करण्यास उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे.
सदर तडजोड किंवा व्यवस्थेच्या प्रती आणि कलम २३० अंतर्गत असलेल्या विवरणाच्या प्रती त्याचे परिसमापक म्हणजेच अनिल काशी द्रोलिया यांच्या "५ वा मजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क नं. IV, अंधेरी-कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३" येथील कार्यालयातून विनामूल्य प्राप्त करता येतील. तडजोड योजनेच्या प्रती आणि या सूचनेसोबत असलेली सर्व कागदपत्रे सभेच्या वेळी ठेवली जातील आणि परिसमापक यांच्या "liquidation.tvmuro@gmail.com" या ईमेल आयडीवर विनंती करून ईमेलद्वारे देखील प्राप्त करता येतील. कंपन्या (तडजोड, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम, २०१६ च्या नियम ११ नुसार, संबंधित तपशिल राहण्यास पात्र असलेल्या प्रत्येक धनकोला किंवा सदस्याला, यासाठी मागणी केल्यापासून एक दिवसाच्या आत, प्रस्तावित तडजोड किंवा व्यवस्थेच्या योजनेच्या प्रतिसह कायद्याच्या कलम २३० अंतर्गत सादर करणे आवश्यक असलेल्या विवरणाची प्रत कंपनीद्वारे विनामूल्य पुरवली जाईल.
स्वतः (किंवा संबंधित सदस्य) उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेल्या व्यक्ती स्वतः किंवा प्रॉक्सीद्वारे मतदान करू शकतील; मात्र त्यासाठी विहित नमुन्यातील सर्व प्रॉक्सी बैठकीच्या किमान ४८ तास आधी परिसमापकाच्या कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. "एससीसी" सदस्य अशा सूचनेच्या प्राप्तीपासून एक महिन्याच्या आत तडजोड किंवा व्यवस्था स्वीकारण्यासाठी बैठकीत, प्रॉक्सीद्वारे किंवा पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करू शकतील.
सभेला उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेली व्यक्ती स्वतः किंवा अधिकृत प्रतिनिधीद्वारे उपस्थित राहू शकते आणि मतदान करू शकते, तसेच त्याच्या / तिच्या / त्यांच्या वतीने उपस्थित राहण्यासाठी आणि मतदान करण्यासाठी प्रॉक्सीची नियुक्ती करू शकते.
स्वाक्षरी/- अनिल काशी द्रोलिया
सभेकरिता नियुक्त केलेले अध्यक्ष
स्थळ : मुंबई
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२६